FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे का.प्र.वि., पहिली खबर क्र. 92, वर्ष 2098 दिनांक 09/03/2098
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act म.प्र अधिनियम 9९८८, कलमे Sections ७, ९२
(ii) अधिनियम Act (सुधारित अधि २०9८), कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार बुधवार, तारीख पासून २८/०२/9९ वेळ ............, तारीखे पर्यंत शुक्रवार वेळ 09/03/2098
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख २८/०२/२०9९, वेळ 9२:३० वा
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 09/9९, तारीख 09/03/209९, वेळ 04:00 वा
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ............, लेखी / तोंडी Written / Oral ............

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा पूर्वेस, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ............
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव किस्मत लाडी गाडी केंद्र, ठिकाणाचे नंबर दुकान क्र. 89, गल्ली ......, रस्त्याचे नाव जम्बोकिंग समोर
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण सिताराम, गाव जाधव मार्ग, पोस्ट लोअर परेल, तालुका ......, जिल्हा मुंबई, राज्य महाराष्ट्र
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ............, तालुका ............, जिल्हा ............, राज्य ............
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name श्री. सिकंदर बाची (b) वडीलाचे / पतीचे नाव श्री. सलीम बाची
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ३२ वर्ष (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ७८८८९९90८६
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ............ दिल्याचा दिनांक ............ दिल्याचे ठिकाण ............ (f) व्यवसाय ............
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ............, जनजात Sub-Caste ............
(h) पत्ता : त्रिशुल बिल्डिंग क्र.२ गल्ली / सेव नं. ......, घर / नाव नंबर 30९, फोन / मो. नंबर ............ पॅन नं. ............ वोटर्स नं. ............
Address Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव सिताराम जाधव मार्ग, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ............ गाव ............ पोस्ट ............ पो. स्टे. ............
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ............ जिल्हा मुंबई ............ राज्य ............ सध्याचा पत्ता ............
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फोर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
(9) सुमेधा शिवाजी सरकटे हि/३४ वर्ष, हुद्दा- शिपाई क्र. ८७, "एफ" विभाग, राज्य उत्पादन शुल्क, ऑपेरा हाऊस, मेघनु रोड, मुंबई - ४
(२) रमेश नरसय्या नंडी हि/३८ वर्ष, हुद्दा. लाडी विक्री (खाजगी इसम) किस्मत लाडी गाडी केंद्र. दु.क्र. 89, जम्बोकिंग समोर मच्छी मार्केट लोअर परेल, मुंबई

Scanned by CamScanner

COMMISSIONER OF POLICE, ANTI CORRUPTION BUREAU, MUMBAI — सत्यमेव जयते

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे — तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी आलोसे सुमेधा सरकाटे यांनी
"फि" यांचे नीरा विक्री परवाना मुदत संपल्याने नवीन परवाना मिळेपर्यंत
कोणतीही कायदेशिर कारवाई न करण्याकरिता तक्रारदार यांचे वडील
श्री. सलीम काझी यांचे मोबाईलवर रु.१६,०००/- इतक्या रक्कमेची
कायदेशिर परिश्रमाशिवाय स्वतःकरिता मागणी करुन तडजोडी अंती
रु.१०,०००/- खाजगी इसम रमेश बेंडे यांचे मार्फतीने स्विकारताना इतराचा
पकडले म्हणुन कलम ७,१२ भ्र.प्र.अ १९८८ (सुधारित अधि २०१८) अन्वये गुन्हा
केला म्हणुन नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................ Rank................ No. ............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ................................ (3) Transferred to P.S ................................,
District ........................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name अविनाश जगताप
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ........
Posting
Code No. of I. O. ........................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned by CamScanner

फिर्याद दिनांक—२८/०२/२०१९.

श्री. सिकंदर सलीम घाची, वय ३२ वर्षे, व्यवसायः निरा विक्रेता, रा.ठि.—त्रिशुल बिल्डिंग क्र. ०२, रूम.नं. ३०९, सिताराम जाधव मार्ग, लोअर परेल (प), मुंबई—१३ मोबाईल नं. ७६६६१११०४६

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर गेल्या ११ महिन्यापासुन माझ्या कुटूंबासमवेत भाडेतत्वावर राहावयास आहे. माझे कुटूंबात माझी पत्नी व माझी दोन मुले राहत आहेत. माझे लोअरपरेल, मुंबई येथे निरा विक्रीचा व्यवसाय असुन त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो. माझे वडील नामे श्री.सलीम रहेमान घाची हे मोगल हाऊस, ३७५/८२, एन.एम.जोशी मार्ग, डिलाईल रोड, मुंबई येथे राहावयास असुन त्यांचा देखील चिंचपोकळी रेल्वे ब्रीज येथे गेल्या दोन वर्षापासुन नीरा विक्रीचा व्यवसाय आहे.

माझे वडील श्री. सलीम घाची यांनी चिंचपोकळी रेल्वे ब्रीजवरील त्यांचा निरा विक्रीचा व्यवसायाचा परवाना संपल्याने त्यांनी सदर निरा विक्रीचा व्यवसाय चालू ठेवण्यासाठी खादी ग्रामोदयोग भवन, डहाणु, जि. पालघर येथील कार्यालयात दिड महिन्यापुर्वी अर्ज केला होता. माझे वडील निरा विक्रीचा व्यवसाय करीत असलेल्या उपरोक्त नमुद पत्त्यावर व माझे लोअर परेल येथील निरा विक्रीच्या ठिकाणी डिसेंबर २०१८ पासुन एक्साईज विभागाचे कर्मचारी श्री. सुमेध सरकटे हे येत आहेत व त्यांनी ते एफ डिव्हीजन मध्ये काम करीत असुन सदर दोन्ही ठिकाणी असलेल्या निरा विक्रीचा व्यवसायाचा परवान्याची मुदत संपल्याने व नविन परवाना मिळेपर्यंत कारवाई न करण्याकरीता व सदरचा व्यवसाय चालविण्याकरीता पैशाची मागणी करीत होते व पैसे न दिल्यास कायदेशीर कारवाई करीन असे त्यांनी माझे वडीलांना सांगितले होते.

आज दि. २७/०२/२०१९ रोजी एक्साईज विभागाचे कर्मचारी सुमेध सरकटे यांनी त्यांचे मोबाईल क्र. ८८७९४९५९१९ या फोनवरून माझे वडीलांच्या मोबाईल क्र. ९१३७८६६३८५ वर फोन केला व जानेवारी महिन्यापासुनचे निरा विक्रीचा व्यवसायाचे बाकी असलेले एकुण १६,०००/— रूपयांची मागणी केली व पैसे नाही दिले तर तुझ्यावर कारवाई करेन असे सांगितले तसेच आज दुपारी पैसे घेण्यासाठी चिंचपोकळी रेल्वे ब्रीज जवळ येत असल्याचे त्यांनी वडीलांना सांगितले.

लोकसेवक सुमेध सरकटे यांना लाच देण्याची माझी व माझे वडीलांची इच्छा नसल्याने आम्ही दि. २७/०२/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार देण्यासाठी गेलो. सदर कार्यालयात माझे वडीलांनी लाचेच्या मागणी बाबतचा त्यांच्या स्वहस्तक्षरातील लेखी तक्रार अर्ज लिहून त्यावर सही केली वपोनि जगताप यांच्याकडे दिला. त्यानंतर पोनि जगताप यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. त्यावर पोनि जगताप यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोनि जगताप यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोनि जगताप यांनी स्वतः स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वतःचे ताब्यात ठेवला.

त्यानंतर लोकसेवक चिंचपोकळी परिसरात भेटण्याची शक्यता असल्याने पोनि जगताप, पोलीस पथक, माझे वडील व मी शासकीय वाहनातुन चिंचपोकळी स्टेशनजवळील आँर्थर रोड नाका, सुभाष नगर येथील दत्त मंदिर जवळ गेलो. पो.नि जगताप यांनी माझे वडीलांच्या मोबाईल फोनवरून लोकसेवक सुमेध सरकटे यांच्या मोबाईल फोनवर फोन करण्यात येणार असुन होणारे संभाषण हे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे पो.नि जगताप यांनी डिजीटल रेकॉर्डर चालू करून माझे वडीलांच्या मोबाईल फोन क्र. ९१३७८६६३८५ वरून लोकसेवक सुमेध सरकटे यांच्या मोबाईल फोन क्र.



Scanned by CamScanner

८८७९४९५९९९ वर फोन केला. सदरवेळी माझे वडील व सुमेध सरकटे यांच्यामध्ये चर्चा झाली परंतु लाचेची प्रत्यक्ष मागणी न झाल्याने माझे वडील पोलीस पथकासह ब्युरो कार्यालयात परत गेले व मी माझे उपरोक्त नमुद राहते घरी निघुन गेलो.

दि. २७/०२/२०१९ रोजी रात्री ०८.०० वा.चे दरम्यान सुमेध सरकटे याने त्याच्या मोबाईल क्र. ८८७९४९५९९९ वरून माझे मोबाईल क्र. ७६६६१११०४६ वर फोन केला व त्याने यापुढे पैशांबाबत माझे वडीलांशी बोलणार नसल्याचे सांगुन फोन बंद केला व त्यानंतर पुन्हा त्याने माझे मोबाईलवर व्हॉट्स ॲप कॉल केला. त्याने माझेकडे डिसेंबर २०१८ पासुन निरा विक्रीचा व्यवसाय चालू ठेवण्याकरीता व कारवाई न करण्याकरीता यापुर्वी मागणी केलेल्या रू. २१,०००/— रूपयांपैकी माझे वडीलांनी त्यांना रू. ५,०००/— दिले असुन उर्वरीत रू. १६,०००/— रूपयांची मागणी केली. लोकसेवक सुमेध सरकटे यांनी ते मंत्रालय अधिवेशन कामकाजाकरीता व्यस्त असल्याने उदया दिनांक २८/०२/२०१९ रोजी ते सांगतिले त्या माणसाकडे पैसे देण्यास त्यांनी मला सांगितले.

दि. २८/०२/२०१९ रोजी सकाळी १०.०० वा. मला व माझे वडीलांना पो.नि. जगताप यांनी ब्युरो कार्यालयात बोलाविल्याचे मला वडीलांकडून समजल्याने आम्ही दोघे ब्युरो कार्यालयात १०.३० वा. हजर झालो. सदरवेळी मी पो.नि जगताप यांना मला लोकसेवकाचा रात्री फोन व व्हॉटस् ॲप कॉल बाबत माहिती देवुन लोकसेवक यांनी माझेकडे लाचेच्या मागणी बाबतचा माझा स्वहस्तक्षरातील लेखी तक्रार अर्ज लिहून त्यावर सही केली व पोनि जगताप यांच्याकडे दिला. त्यानंतर पोनि जगताप यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. त्यावर पोनि जगताप यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोनि जगताप यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोनि जगताप यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर लोकसेवक चिंचपोकळी परिसरात भेटण्याची शक्यता असल्याने पोनि जगताप, पोलीस पथक, व मी शासकीय वाहनातुन चिंचपोकळी (प) रेल्वे स्टेशनजवळील ऑर्थर रोड नाका, सुभाष नगर येथील दत्त मंदिर जवळ गेलो. पो.नि जगताप यांनी माझे मोबाईल फोनवरून लोकसेवक सुमेध सरकटे यांच्या मोबाईल फोनवर फोन करण्यात येणार असुन होणारे संभाषण हे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे पो.नि जगताप यांनी डिजीटल रेकॉर्डर चालू करून माझे मोबाईल फोन क्र. ७६६६१११०४६ वरून लोकसेवक सुमेध सरकटे यांच्यामोबाईल फोन क्र. ८८७९४९५९९९ वर वॉटस् टॅप कॉल केला व मी लोकसेवक यांना कोठे भेटायच? याबाबत विचारणा केली असता आमचे लोअर परेल येथे भेटण्याचे ठरले.

त्याप्रमाणे पोनि जगताप यांनी उर्वरीत पथकास शासकीय वाहनासह ईस्टर्न बेकरीजवळ, साईधाम बिल्डींग, ना.म. जोशी मार्ग, लोअर परेल पुलाखाली, लोअर परेल पुर्व, मुंबई येथे थांबण्यास सांगितले. तसेच मी पंचासह लोअर परेल येथे माझे धंदयाचे ठिकाणी लोकसेवक सुमेध सरकटे यांना भेटण्याकरीता गेलो. लोकसेवक सुमेध सरकटे मला मिळुन न आल्याने मी पुन्हा लोकसेवक सरकटे यांच्या मोबाईलवर वॉटस् ॲप कॉल केला असता त्यांनी मला किस्मत ताडी माडी केंद्र, दु.क्र. ९९, जम्बो किंग समोर, मच्छी मार्केट, लोअर परेल पुलाखाली, लोअर परेल, मुंबई येथे भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी लोकसेवक यांना भेटलो असता लोकसेवक व माझेमध्ये पैशासंबंधी चर्चा झाली व पुर्वी ठरल्याप्रमाणे रू. १६,०००/— लाचेच्या रक्कमेची मागणी केली असता मी त्यांना रू. १०,०००/— देतो असे सांगितले असता लोकसेवक यांनी ऐकले नाही व



Scanned by CamScanner

संपुर्ण रक्कम मला देण्यास सांगितले असता मी त्यांना माझे दादीकडून पैसे घेवुन येतो असे सांगितले व वेळ मागुन घेतला.

त्यानंतर मी पुन्हा पोलीस वाहन थांबले होते त्याठिकाणी आलो असता पोनि जगताप यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकुन लोकसेवक यांची पडताळणी दरम्यान लाचेची मागणी निष्पन्न झाल्याने लागलीच सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १०,०००/— (रू. ५००/— दराच्या १८व रू.१००/— दराच्या ८ तसेच रू. ५०/— दराच्या ४ भारतीय चलनी नोटा, ) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांना अॅंथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच पोनि जगताप यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यावर मला माझे डोक्यावरून हात फिरवुन इशारा करण्यास सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही अशा ठिकाणी थांबून पुर्वनियाजीत इशारा मिळताच लोकसेवक यांना रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्याचदरम्यान लोकसेवक सुमेध सरकटे यांचा माझे मोबाईल फोनवर फोन आला व इतका उशीर का होत आहे? याबाबत माझेकडे विचारणा केली असता पैशांची जमवाजमव करण्याकरीता मी त्यांच्याकडे थोडा वेळ मागितला. त्यावेळी लोकसेवक यांनी त्यांना उशीर होत असुन ताडीमाडीचा रमेश याच्याकडे पैसे देण्यास मला सांगितले.

त्यानंतर शासकीय वाहनातील पो.ना.चा. शिवथरे यांनी पंचासमक्ष लाचेच्या रकमेस अॅंथ्रासीन पावडर लावली व सापळा कारवाईकरीता मी रमेश याच्या किस्मत ताडी माडी केंद्र, दु.क्र. ९१, जम्बो किंग समोर, मच्छी मार्केट, लोअर परेल पुलाखाली, लोअर परेल, मुंबई येथे आलो. त्यावेळी पो.नि. जगताप यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंचासह पाठविले व माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून थांबले. मी लोकसेवक यांनी सांगितलेला ताडीमाडीच्या दुकानावरील रमेश याला भेटलो व मी माझ्याकडील अॅंथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. १०,०००/—(रू. ५००/— दराच्या १८व रू. १००/— दराच्या ८ व रू. ५०/— दराच्या ४ भारतीय चलनी नोटा, ) त्याला दिल्या असता रमेश याने मला एक सफेद रंगाचा लिफाफा दिला व लाचेची रक्कम त्यात ठेवण्यास सांगितले त्याप्रमाणे मी लाचेची रक्कम लिफाफ्यात ठेवली त्याच दरम्यान लोकसेवक याचा रमेश याच्या मोबाईलवर फोन आला असता रमेश याने सदरचा फोन रिसीव्ह करून मला दिला. त्यावेळी लोकसेवक यांनी मला पैसे दिले काय? याबाबत विचारणा केली असता मी लोकसेवक यांस दहा हजार रूपये आहेत असे सांगितले. लोकसेवक यांनी उर्वरीत रक्कमेबाबत माझेकडे विचारणा केली असता मी उर्वरीत रक्कम दोन दिवसांत देतो असे सांगितले. त्यानंतर मी रमेश यास दहा हजार रूपये देवू का? याबाबत विचारणा केली असता लोकसेवक यांनी रमेश यास दहा हजार रूपये देण्यास सांगुन फोन देखील रमेश यास देण्यास सांगितले त्याप्रमाणे मी रमेश यास पैसे दिले. त्यानंतर मी पैसे ठेवलेला लिफाफा रमेश याकडे दिला. त्यानंतर रमेशने मी दिलेली लाचेची रक्कम हाताने मोजू लागला त्याच दरम्यान लोकसेवक तेथे आले असता मी पोलीस पथकास पुर्वनियोजीत इशारा केला असता लागलीच पोलीस पथकांनी लोकसेवक व खाजगी इसम रमेश यांस रूपये १०,०००/— लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले व ताब्यात घेतले.



Scanned by CamScanner

तरी लोकसेवक सुमेध सरकटे, शिपाई, राज्य उत्पादन शुल्क विभाग, ऑपेरा हाऊस, मॅथ्यु रोड, मुंबई यांनी माझेकडे निरा विक्रीचा परवाना मुदत संपल्याने नविन परवाना मिळेपर्यंत कायदेशीर कारवाई न करण्याकरीता व निरा विक्रीचा व्यवसाय चालू ठेवण्याकरीता रू. १६,०००/– लाचेची मागणी केली व तडजोडीअंती खाजगी इसम नामे रमेश नरसव्या बंडी यांच्या मार्फतीने रू. १०,०००/– लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्यांच्याविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहीली, ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

Sghadi
1/3/2019

समक्ष,
113

(अविनाश जगताप),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभासग,
मुंबई



Scanned by CamScanner